"गोड मुलांनो - तुम्ही खरे-खरे राजऋषी आहात, तुमचे कर्तव्य आहे तपस्या करणे, तपस्येनेच पूजन लायक बनाल"

प्रश्नः- असा कोणता पुरुषार्थ आहे जो कायमसाठी पूजनीय बनवितो?

उत्तरः- आत्म्याची ज्योत जागृत करण्याचा किंवा तमोप्रधान आत्म्याला सतोप्रधान बनविण्याचा पुरुषार्थ करा तर कायमसाठी पूजनीय बनाल. जे आता चुका करतात ते खूप रडतात. जर पुरुषार्थ करून पास झाला नाहीत, धर्मराजाकडून सजा खाल्लीत तर सजा खाणारे पुजले जाणार नाहीत. सजा खाणारा तोंड वर करू शकणार नाही.

ओम् शांती. रुहानी मुलांप्रती रुहानी बाबा समजावून सांगत आहेत. सर्वप्रथम तर मुलांना समजावून सांगतात की, स्वतःला आत्मा निश्चय करा. आधी आत्मा आहे, नंतर शरीर आहे. जिकडे-तिकडे प्रदर्शनी अथवा म्युझियममध्ये, क्लासमध्ये सर्वात पहिले हे बजावून सांगायचे आहे की, स्वतःला आत्मा समजून बाबांची आठवण करा. मुले जेव्हा बसतात, सर्वजण देही-अभिमानी होऊन बसत नाहीत. इथे बसूनही विचार बाहेर कुठेतरी जातात. सत्संगामध्ये जोपर्यंत कोणी साधू इत्यादी येत नाहीत तोपर्यंत बसून काय करतात. कोणत्या ना कोणत्या विचारामध्ये बसून राहतात आणि साधू आले की मग कथा इत्यादी ऐकू लागतात. बाबांनी सांगितले आहे - हे सर्व भक्तीमार्गामधील ऐकणे-ऐकवणे आहे. बाबा समजावून सांगतात की, हे सर्व आहे - आर्टिफिशिअल (कृत्रिम). यामध्ये काहीच नाहीये. दिवाळी देखील कृत्रिमरीत्या साजरी करतात. बाबांनी समजावून सांगितले आहे - ज्ञानाचा तिसरा नेत्र उघडला पाहिजे तर घराघरामध्ये प्रकाश होईल. आता तर घराघरामध्ये अंधारच आहे. हा सर्व बाह्य प्रकाश आहे. तुम्ही आपली ज्योत जागृत करण्यासाठी अगदी शांतीमध्ये बसता. मुले जाणतात स्व-धर्मामध्ये राहिल्याने पापे नष्ट होतात. जन्म-जन्मांतरीची पापे या आठवणीच्या यात्रेनेच नष्ट होतात. आत्म्याची ज्योत विझली आहे ना. शक्तीचे पेट्रोल सर्व संपून गेले आहे. ते पुन्हा भरेल कारण आत्मा पवित्र बनते. किती रात्र-दिवसाचा फरक आहे. आता लक्ष्मीची किती पूजा होते. बरीच मुले लिहितात - लक्ष्मी मोठी की सरस्वती माँ मोठी. लक्ष्मी तर एक असते - श्री नारायणाची. जेव्हा महालक्ष्मीची पूजा करतात तेव्हा तिला चार भुजा दाखवतात. त्यामध्ये दोघेही येतात. वास्तविक त्याला लक्ष्मी-नारायणाची पूजा म्हटले पाहिजे. चतुर्भुज आहेत ना - दोघेही एकत्र आहेत. परंतु लोकांना काहीच समजत नाही. बेहदचे बाबा म्हणतात की, सर्व बेसमज (अडाणी) बनले आहेत. लौकिक पिता कधी सर्व दुनियेच्या मुलांना म्हणेल का की बेसमज (अडाणी) आहेत. आता तुम्ही मुले जाणता - विश्वाचा पिता कोण आहे? स्वतः म्हणतात मी सर्व आत्म्यांचा पिता आहे. तुम्ही सर्व माझी मुले आहात. ते साधू लोक तर म्हणतात सर्व भगवानच भगवान आहेत. तुम्ही जाणता बेहदचे बाबा बेहदचे ज्ञान आम्हा आत्म्यांना समजावून सांगत आहेत. लोकांना तर देह-अभिमान असतो - 'मी अमका आहे...' शरीराला नाव ठेवले आहे, त्यानुसार चालत आले आहेत. आता शिवबाबा तर आहेत निराकार, सुप्रीम सोल. त्या आत्म्याचे नाव आहे - शिव. आत्म्यावर नाव एका शिवबाबांचेच आहे. बस्स, ते आहेत परम आत्मा, परमात्मा, त्यांचे नाव आहे - शिव. बाकी जे काही खंडीभर आत्मे आहेत त्या सर्वांच्या शरीरांची नावे ठेवलेली आहेत. शिवबाबा इथे राहत नाही, ते तर परमधाम वरून येतात. 'शिव-अवतरण' देखील आहे. आता बाबांनी तुम्हाला समजावून सांगितले आहे - सर्व आत्मे इथे येतात पार्ट बजावण्याकरिता. बाबांचा देखील पार्ट आहे. बाबा तर खूप मोठे काम इथे करतात. अवतार मानतात तर त्यांचे हॉलिडे आणि स्टॅम्प इत्यादी असले पाहिजेत. सर्व देशांमध्ये हॉलिडे असायला हवा कारण बाबा तर सर्वांचे सद्गती दाता आहेत ना. त्यांचा जन्मदिवस आणि जाण्याचा दिवस, तारीख इत्यादी विषयी समजू सुद्धा शकत नाही कारण हे तर न्यारे आहेत ना म्हणून फक्त 'शिवरात्री' म्हणतात. हे देखील तुम्ही मुले जाणता - अर्धा कल्प आहे बेहदचा दिवस, अर्धा कल्प आहे बेहदची रात्र. रात्र पूर्ण होऊन मग दिवस होतो. त्याच्या मधल्या काळामध्ये बाबा येतात. ही तर अचूक वेळ आहे. माणूस जेव्हा जन्मतो तेव्हा म्युन्सिपाल्टीमध्ये (नगरपालिकेमध्ये) त्याची नोंद करतात ना, मग सहा दिवसानंतर त्याचे नाव ठेवतात, त्याला म्हणतात - बारसे. कुणी सटवाई म्हणतात. भाषा तर अनेक आहेत ना. लक्ष्मीची पूजा करतात - आतषबाजी करतात (फटाके फोडतात). तुम्ही विचारू शकता लक्ष्मीचा सण जो तुम्ही साजरा करता, ती सिंहासनावर कधी बसली? सिंहासनावर बसण्याचाच राज्याभिषेक

साजरा करतात, त्यांचा जन्म दिवस साजरा करत नाहीत. लक्ष्मीचे चित्र तबकामध्ये ठेवून तिच्याकडे धन मागतात. बस अजून काही नाही. मंदिरामध्ये जाऊन भले काही मागतील, परंतु दिवाळीच्या दिवशी तर तिच्याकडे फक्त पैसे मागतील. लक्ष्मी काही पैसे देते थोडीच. ही तर ज्याप्रमाणे भावना आहे... जर कोणी खऱ्या भावनेने पूजा करत असेल तर अल्पकाळासाठी धन मिळू शकते. हे आहेच अल्पकाळाचे सुख. कुठेतरी स्थायी सुख सुद्धा असेल ना. स्वर्गा विषयी तर त्यांना माहीतच नाहीये. इथे स्वर्गाशी कशाचीही तुलना होऊ शकत नाही.

तुम्ही जाणता अर्धाकल्प आहे - ज्ञान, अर्धाकल्प आहे - भक्ती. मग असते वैराग्य. सांगितले जाते - ही जुनी छी-छी दुनिया (विकारी दुनिया) आहे म्हणून मग नवीन दुनिया जरूर हवी आहे. नवीन दुनिया वैकुंठला म्हणतात, त्याला हेवन, पॅराडाईज म्हटले जाते. या ड्रामामध्ये पार्टधारी देखील अविनाशी आहेत. तुम्हा मुलांना आता ठाऊक झाले आहे की आपण आत्मे कसा पार्ट बजावतो. बाबांनी समजावून सांगितले आहे - कोणालाही प्रदर्शनी इत्यादी दाखवायची असेल तर सर्वप्रथम या एम ऑब्जेक्ट विषयी समजावून सांगायचे आहे. सेकंदामध्ये जीवनमुक्ती कशी मिळते - जन्म-मरणामध्ये तर जरूर यायचेच आहे. तुम्ही शिडीच्या चित्रावर खूप चांगल्या रीतीने समजावून सांगू शकता. रावण राज्यामध्ये भक्ती सुरू होते. सतयुगामध्ये भक्तीचे नामोनिशाणही नसते. ज्ञान आणि भक्ती दोन्ही वेगवेगळे आहेत ना. आता तुम्हाला या जुन्या दुनियेपासून वैराग्य आहे. तुम्ही जाणता - ही जुनी दुनिया आता नष्ट होणार आहे. वडील मुलांना सदैव सुख देणारे असतात. मुलांसाठीच वडील किती मेहनत करत असतात. मुलासाठीच गुरूंकडे जातात, साधूंकडे जातात - काहीही करून मुलगा व्हावा, कारण समजतात की, मुलगा झाला तर त्याला आपण आपली जायदात देऊन जाऊ. मुलगा झाला तर त्याला आपण वारसदार बनवू. तर बाबा कधी मुलांना दुःख थोडेच देतील. अशक्य आहे. 'तुम मात-पिता', असे म्हणून किती टाहो फोडत असतात. तर मुलांचे रुहानी बाबा सर्वांना सुखाचाच रस्ता सांगतात. सुख देणारे एक बाबाच आहेत. दुःख-हर्ता, सुख-कर्ता एक रुहानी बाबा आहेत. हा विनाश देखील सुखासाठीच आहे. नाही तर मुक्ती-जीवनमुक्ती कशी मिळणार? परंतु हे देखील कोणी समजतील थोडेच. इथे तर हे आहेत गरीब, अबला, ज्या स्वतःला आत्मा निश्चय करू शकतात. बाकी मोठ्या लोकांना देहाचा अभिमान इतका पक्का झाला आहे काही विचारू नका. बाबा वारंवार समजावून सांगतात - तुम्ही राजऋषी आहात. ऋषी नेहमी तपस्या करतात. ते (साधू-संन्यासी) तर ब्रह्मची, तत्वाची आठवण करतात किंवा कोणा काली इत्यादीची देखील आठवण करत असतील. अनेक संन्यासी देखील आहेत जे कालीची पूजा करतात. 'माँ काली', असे म्हणून बोलावतात. बाबा म्हणतात - यावेळी सर्व विकारी आहेत. काम-चितेवर बसून सर्वजण काळे झाले आहेत. आई, वडील, मुले सर्व काळे (पतित) आहेत. ही बेहदची गोष्ट आहे, सतयुगामध्ये काळे असत नाहीत, सर्व गोरे (पावन) आहेत. पुन्हा कधीतरी सावळे बनतात. हे तुम्हा मुलांना बाबांनी समजावून सांगितले आहे. थोडे-थोडे पतित होत-होत शेवटी पूर्णपणे काळे होतात (पूर्ण पतित बनतात). बाबा म्हणतात - रावणाने काम-चितेवर चढवून एकदम काळे बनवले आहे. आता पुन्हा तुम्हाला ज्ञान-चितेवर चढवतो. आत्म्यालाच पवित्र बनायचे असते. आता पतित-पावन बाबा येऊन पावन बनण्याची युक्ती सांगतात. पाणी तुम्हाला पावन बनण्याची कशी युक्ती सांगेल. परंतु तुम्ही कोणाला समजावून सांगाल तर कोटींमध्ये कोणीच समजून घेऊन उच्च पद प्राप्त करतात. आता तुम्ही बाबांकडून आपला २१ जन्मांसाठी वारसा घेण्यासाठी आला आहात. तुम्हाला पुढे जाऊन अनेक साक्षात्कार होतील. तुम्हाला स्वतःच्या अभ्यासाबद्दल सर्वकाही कळेल. जे आता चुका करतात ते नंतर मग खूप रडतील. शिक्षा देखील अनेक असतात ना. मग पद देखील भ्रष्ट होईल . तोंड वर करू शकणार नाही म्हणून बाबा म्हणतात - 'गोड-गोड मुलांनो, पुरुषार्थ करून पास व्हा, जेणेकरून अजिबात सजा भोगावी लागू नये तेव्हाच पूजनीय देखील बनाल. शिक्षा भोगली तर मग थोडेच पुजले जाल. तुम्हा मुलांना खूप पुरुषार्थ केला पाहिजे. आपल्या आत्म्याची ज्योत जागृत करायची आहे. आता आत्मा तमोप्रधान बनली आहे, तिलाच सतोप्रधान बनवायचे आहे. आत्मा आहेच बिंदू. एका ताऱ्याप्रमाणे आहे. त्याचे दुसरे कोणतेही नाव ठेवू शकत नाही. मुलांना समजावून सांगितले आहे की, काहींना त्याचा साक्षात्कार झाला आहे. स्वामी विवेकानंद आणि रामकृष्ण परमहंस यांच्या विषयी सांगतात. त्यांनी पाहिले रामकृष्ण परमहंस यांच्या मस्तकातून प्रकाश निघाला; ती तर आत्माच निघते. विवेकानंदांना वाटले की तो प्रकाश आपल्यामध्ये विलीन झाला. आता आत्मा काही येऊन अशी विलीन थोडीच होऊ शकते. ती तर जाऊन दुसरे शरीर घेते. शेवटी तुम्ही खूप बघाल. नावा-रूपा शिवाय कोणतीही गोष्ट असत नाही. आकाश पोलार (पोकळ) आहे, त्याचे देखील नाव आहे. आता हे तर मुले समजतात, कल्प-कल्प स्थापना जी होत आली आहे ती होणारच आहे. आम्ही ब्राह्मण नंबरवार पुरुषार्थ करत राहतो. जो-जो सेकंद सरतो त्याला ड्रामाच म्हटले जाते. संपूर्ण दुनियेचे चक्र फिरत राहते. हे ५ हजार वर्षांचे चक्र,

रहाटा प्रमाणे फिरत राहते. टिक-टिक होत राहते, आता तुम्हा गोड-गोड मुलांनी फक्त बाबांचीच आठवण करायची आहे. चालता-फिरता, काम करताना बाबांची आठवण करण्यामध्येच कल्याण आहे. नाहीतर माया थप्पड मारेल. तुम्ही आहात ब्राह्मण, भ्रामरी प्रमाणे किड्यांना आप समान ब्राह्मण बनवायचे आहे. त्या भ्रामरीचा तर एक दृष्टांत आहे. तुम्ही आहात खरे-खरे ब्राह्मण. ब्राह्मणांनाच मग देवता बनायचे आहे म्हणून तुमचे हे आहे पुरुषोत्तम बनण्यासाठी संगमयुग. इथे तुम्ही येताच पुरुषोत्तम बनण्यासाठी. पहिले जरूर ब्राह्मण बनावे लागेल. ब्राह्मणांची शेंडी आहे ना. तुम्ही ब्राह्मणांना समजावून सांगू शकता. बोला, तुम्हा ब्राह्मणांचे तर कुळ आहे, ब्राह्मणांची राजधानी नाहीये. तुमचे हे कुळ कोणी स्थापन केले? तुमचे मोठे कोण आहेत? आणि मग तुम्ही जेव्हा समजावून सांगाल तर खूप खुश होतील. ब्राह्मणांना मान देतात कारण ते शास्त्र इत्यादी ऐकवतात. पूर्वी राखी बांधण्यासाठी देखील ब्राह्मण जात असत. आजकाल तर मुली जातात. तुम्हाला तर राखी त्यांना बांधायची आहे जे पवित्रतेची प्रतिज्ञा करतील. प्रतिज्ञा जरूर करावी लागेल. भारताला पुन्हा पावन बनविण्यासाठी आम्ही ही प्रतिज्ञा करतो. तुम्ही देखील पावन बना, इतरांना देखील पावन बनवा. इतर कोणाचीही ताकद नाही जे असे म्हणू शकतील. तुम्ही जाणता हा अंतिम जन्म पावन बनल्याने आपण पावन दुनियेचे मालक बनतो. तुमचा धंदाच हा आहे; असे मनुष्य कोणी असतच नाहीत. तुम्ही जाऊन त्यांच्याकडून (दुनियेतील लोकांना) ही शपथ घ्यायला लावायची आहे. बाबा म्हणतात - काम महाशत्रू आहे, यावर विजय मिळवायचा आहे. यावर विजय मिळवल्यानेच तुम्ही जगतजीत बनाल. या लक्ष्मी-नारायणाने जरूर मागील जन्मामध्ये पुरुषार्थ केला आहे, तेव्हाच तर असे बनले आहेत ना. आता तुम्ही सांगू शकता - कोणत्या कर्मांमुळे यांना हे पद मिळाले, यामध्ये गोंधळून जाण्याचा तर काही प्रश्नच नाही. तुम्हाला ही दिवाळी इत्यादी विषयी काही आनंद नाहीये. तुम्हाला आनंद आहे - आम्ही बाबांचे बनलो आहोत, त्यांच्याकडून वारसा प्राप्त करतो. भक्तिमार्गामध्ये मनुष्य किती खर्च करतात. किती नुकसान देखील होते. आग लागते. परंतु समजत नाहीत.

तुम्ही जाणता आता आपण पुन्हा आपल्या नवीन घरी जाणार आहोत. चक्र पुन्हा हुबेहूब रिपीट होईल ना. ही बेहदची फिल्म आहे. बेहदचा स्लाईड शो आहे. बेहद बाबांचे बनलो आहोत तर परमानंद झाला पाहिजे. आम्ही बाबांकडून स्वर्गाचा वारसा जरूर घेऊ. बाबा म्हणतात - पुरुषार्थाने जे पाहिजे ते घ्या. पुरुषार्थ तुम्हाला जरूर करायचा आहे. पुरुषार्थानेच तुम्ही उच्च बनू शकता. हे बाबा (वृद्ध ब्रह्मा बाबा) इतके उच्च बनू शकतात तर तुम्ही का नाही बनू शकत. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

१) जसे बाबा सदैव मुलांच्यासाठी सुखदायी आहेत, असे सुखदायी बनायचे आहे. सर्वांना मुक्ती-जीवनमुक्तीचा रस्ता सांगायचा आहे.

२) देही-अभिमानी बनण्याची तपस्या करायची आहे. या जुन्या छी-छी दुनियेपासून बेहदचे वैरागी बनायचे आहे.

वरदान:- प्रत्येकाच्या विशेषतेला स्मृतीमध्ये ठेवून फेथफुल बनून एकमत संघटन बनविणारे सर्वांचे शुभचिंतक भव

ड्रामा अनुसार प्रत्येकाला कोणती ना कोणती विशेषता अवश्य प्राप्त आहे, त्या विशेषतेला कार्यामध्ये लावा तसेच इतरांच्याही विशेषतेलाच बघा. एकमेकांशी फेथफुल रहा (विश्वासू बनून रहा) तर त्यांच्या गोष्टींचा भाव बदलेल. जेव्हा प्रत्येकाच्या विशेषतेला बघाल तेव्हा अनेक असूनही एक असल्याप्रमाणे दिसाल. संघटन एकमत होईल. कोणी कोणा विषयी निंदात्मक गोष्ट ऐकवली तर त्याला टेका देण्याऐवजी (प्रोत्साहन देण्याऐवजी) ऐकविणाऱ्याचे रूप परिवर्तन करून टाका, तेव्हा म्हणणार - शुभचिंतक.

बोधवाक्य:- श्रेष्ठ संकल्पांचा खजिना हाच श्रेष्ठ प्रारब्ध अथवा ब्राह्मण जीवनाचा आधार आहे.

||| ओम शांती |||

अव्यक्त इशारे:- अशरीरी व विदेही स्थितीचा अभ्यास वाढवा जर सेकंदामध्ये विदेही बनण्याचा अभ्यास नसेल तर अखेरचा क्षण देखील युद्धातच जाईल आणि ज्या गोष्टीमध्ये कमजोर असाल, भले स्वभावामध्ये, संबंधात येण्यामध्ये, संकल्प शक्तीमध्ये, वृत्तीमध्ये, वायुमंडळाच्या प्रभावामध्ये, ज्या गोष्टीमध्ये कमजोर असाल, त्याच रूपामध्ये जाणूनबुजून माया देखील शेवटचा पेपर घेईल म्हणून विदेही बनण्याचा अभ्यास खूप जरुरी आहे.